# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक १३०) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.१६ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## यापुढे काळजी घेऊ, जिरेटोपच्या वादावर प्रफुल्ल पटेलांचे स्पष्टीकरण

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीतून तिसऱ्यांदा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या वेळी देशभरातील एनडीए मधील प्रमुख नेते उपस्थित होते. यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून प्रफुल्ल पटेल यांनी मोदींचा जिरेटोप देऊन सत्कार केला होता. यावरुन शरदचंद्र पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांच्यावर टीका केली होती. प्रफुल्ल पटेल लाज बाळगा, ''जिरेटोप'' आहे तो तुमच्या हातात अन् त्या बीभत्स माणसाच्या डोक्यावर शोभत नाही ! अशा शब्दात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पटेल यांच्यावर निशाणा साधला होता. इतकेच नाही तर यावर मराठा समाजाच्या नेत्यांनीही नाराजी व्यक्त केली होती. यावरुन आता प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्टीकरण दिले आहे. यापुढे काळजी घेऊ, असे म्हणत पटेल यांनी या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार प्रफुल्ल पटेल यांनी एका पोस्टच्या माध्यमातून या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आहे. या पोस्टमध्ये ते म्हणाले की, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या आदर्शांवर व लोककल्याणाच्या मार्गावर मार्गक्रमण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान होईल, अशी कोणतीही गोष्ट कधी मनातही येऊ शकत नाही. यापुढे काळजी घेऊ असे ते म्हणाले.

## राहुल गांधींकडून मंचावर शिवरायांचा तिरस्कार-पंतप्रधान मोदी

मुंबई/नाशिक दि.१५ (प्रतिनिधी)- काँग्रेसचे युवराज (राहुल गांधी) वीर सावरकरांचा आपमान करतात, मंचावर उभे राहून छत्रपती शिवाजी महाराजांचा तिरस्कार करतात आणि सावरकरांचं, शिवाजी महाराजांचं नाव घेणारी नकली शिवसेना मात्र शांत बसते. आम्ही टीका केल्यानंतर नकली शिवसेना आणि काँग्रेसच्या मित्रपक्षांनी काँग्रेसचा युवराजाला समजावलं की या निवडणुकीत सावरकरांबद्दल काही बोलू नको. तेव्हापासून युवराज सावरकरांबद्दल काही बोलले नाहीत असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

शिवसेनेच्या शिंदे गटातील खासदार आणि कल्याण लोकसभेचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ महायुतीने कल्याणमध्ये आयोजित केलेल्या प्रचारसभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावली. मोदी यांनी या सभेला संबोधित करताना शिवसेनेच्या ठाकरे गटावर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटावर आणि काँग्रेसवर सडकून टीका केली.

नरेंद्र मोदी म्हणाले, देशात आपलं सरकार आल्यापासून आपण आपल्या शत्रूंच्या मुसक्या आवळल्या आहेत. आपल्या शेजारचा देश पाकिस्तानची भारताला ललकारण्याची हिंमत नाही. मात्र हे काँग्रेसवाले असं सांगतात की पाकिस्तानचा सन्मान करा, का? तर म्हणे, त्यांच्याकडे अणुबॉम्ब आहे. अरे त्या पाकिस्तानकडे त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी पैसे नाहीत आणि तुम्ही आम्हाला त्यांची भीती दाखवता? देशात काँग्रेसचं सरकार असतं तेव्हा पाकिस्तान आपल्याला धमकी देतो आणि काँग्रेसचं सरकार त्यांना म्हणतं, प्लीज आमच्यावर हल्ला करू नका. तसेच देशात काँग्रेसचं सरकार नसतं तेव्हा हे काँग्रेसवाले आपल्याला पाकिस्तानच्या बाजूने धमक्या देतात. पाकिस्तानने त्यांच्या संसदेत मान्य केलं आहे की त्यांनी आपल्यावर (भारतावर) दहशतवादी



हल्ले केले आहेत. तरीदेखील भारतात काँग्रेस आणि हे इंडिया आघाडीवाले त्याच पाकिस्तानला क्लीनचीट देतात. इंडिया आघाडी पाकिस्तानच्या बाजूने मतदान करते. काँग्रेसची नेहमीच एका विशिष्ट समाजाला तुष्टीकरण करण्याची मानसिकता राहिली आहे. इंडिया आघाडीवालेदेखील आता तेच करू लागले आहेत असा हल्लाबोल त्यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नाशकातही महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादीवर परखड टीका केली. नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा काँग्रेसमध्ये विलीनीकरण हे नक्की आहे. मात्र ज्या दिवशी नकली शिवसेनेचे विलीनीकरण हे काँग्रेसमध्ये होईल, त्या दिवशी मला सर्वात जास्त बाळासाहेब ठाकरेंची आठवण येईल. ज्या दिवशी काँग्रेसमध्ये शिवसेना विलीन होईल, त्या दिवशी मी माझ्या दुकानाचे शटर खाली घेईल, असे बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते. अशी आठवण देखील नरेंद्र मोदी यांनी करुन दिली. अयोध्या मध्ये प्रभू रामचंद्रांचे मंदिर करणे हे बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते. जम्मू-काश्मीर मधून कलम ३७० काढून टाकावे हे बाळासाहेबांचे स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण झाले. मात्र, त्यामुळे सगळ्यात जास्त राग नकली शिवसेनेला येत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे.

काँग्रेस (पान ४ वर)

## ज्या सत्तेला सोनिया गांधींनी नाकारले, त्या सत्तेवर मोदींचा डोळा; मल्लिकार्जुन खरगेंचा हल्लाबोल

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- लोकसभा निवडणुकीसाठी चार टप्प्यातील मतदान झाले असून, आगामी मतदानासाठी सर्व नेत्यांचा जोरदार प्रचार सुरु आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज रायबरेली लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ सभा घेतली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली. ज्या सत्तेला सोनिया गांधी यांनी नाकारले, ते सत्तेकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी डोळे लावून बसले आहेत, असे खरगे म्हणाले.

आज देशभरात अनक भुकेल्यांना जेवण मिळत नाही, जेवणाची काही व्यवस्था करावी. अनेक तरुणांना नोकरी मिळत



नाही, नोकरीची काही व्यवस्था करावी. पण, मोदींचे या मुद्द्यांकडे नाही, तर फक्त सत्तेवर लक्ष आहे. २००४ मध्ये अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखाली भाजपचा पराभव झाला, तेव्हा सोनिया गांधींनी आपल्या मित्रपक्षांच्या इच्छेविरुद्ध पंतप्रधान होण्यास नकार दिला आणि काँग्रेसच्या वतीने मनमोहन सिंग यांचे नाव पुढे केले. ज्या सत्तेला सोनिया गांधींनी नाकारले, त्यावर मोदींचा डोळा आहे, अशी टीका खरगेंनी केली.

ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची निवडणूक आहे, देशाचे भविष्य घडवणारी निवडणूक आहे. देशातील दलित, मागासलेले, आदिवासी, गरीब, शेतकरी यांना वाचवण्याची ही निवडणूक आहे. यात जर काही चूक झाली तर या देशात मनु जन्माला येईल आणि मनुस्मृतीची राजवट चालेल आणि संविधानाची राजवट संपेल.मोदी आणि भाजपला परत आणण्याचा प्रयत्न म्हणजे दलित, मागासवर्गीय, आदिवासी, गरीब आणि शेतकरी यांचा विश्वासघात आहे. चुकूनही कोणी भाजपला मत दिले, तर ते अनुसूचित जाती, आदिवासी आणि मागासवर्गीयांच्या विरोधात मतदान असेल, असेही खरगे यावेळी म्हणाले.

## कितीही सभा घ्या, रोड शो घ्या, महाराष्ट्र तुमच्यामागे उभा राहणार नाही-संजय राऊत

नाशिक दि.१५ (प्रतिनिधी)- गेल्या एक महिन्यात मोदींनी महाराष्ट्रात २८ सभा घेतल्या. शिवसेनेमुळे नरेंद्र मोदींना रस्त्यावर यावे लागले. कितीही सभा घ्या, रोड शो घ्या, हा महाराष्ट्र तुमच्या मागे उभा राहणार नाही, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. नाशिकच्या अनंत कान्हेरे मैदानावर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरेंच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

संजय राऊत म्हणाले की, ही विराट सभा गॅरंटी देतेय राजाभाऊ १०० टक्के दिल्लीला जाताय. विरोधी उमेदवाराला इथे पप्पी घ्यायला पाठवून देऊ. गेल्या दहा वर्षात ज्यांना आपण खासदारकीची संधी दिली त्यांनी काय केले. त्यांना ५० - १०० कोटी मिळाले हा त्यांचा प्रश्न आहे, असा टोला त्यांनी हेमंत गोडसेंना लगावला.

आज मिस्टर फेकू सुद्धा नाशकात (पान ४ वर)

## गुजरातच्या जीएसटी आयुक्तांनी ६२० एकर जमीन बळकावली

### महाबळेश्वरमध्ये नातेवाईकांसोबत गावच खरेदी केले; सामाजिक कार्यकर्त्यांचा आरोप

सातारा दि.१५ (प्रतिनिधी)- नंदुरबारचे रहिवासी असलेले आणि सध्या अहमदाबाद, गुजरात येथे जीएसटी मुख्य आयुक्त असणारे चंद्रकांत वळवी यांनी कांदाटी खोऱ्यातील तब्बल ६४० एकर जमीन बळकावली आहे, असा आरोप बुधवारी माहिती अधिकार, सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी पत्रकार परिषद घेऊन केला.

साताराच्या जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी प्रशासनातील सर्व संबंधित जबाबदार घटकांवर फौजदारी कारवाईचे आदेश पारित करावेत, अन्यथा १० जून २०२४ पासून जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशाराही मोरे यांनी दिला.

पत्रकार परिषदेमध्ये सुशांत मोरे म्हणाले की, जिल्ह्यातल्या सर्वात अतिदुर्गम व पर्यावरणीयदृष्टया अतिसंवेदनशील समजल्या जाणाऱ्या कांदाटी खोऱ्याच्या आता मुळशी पॅटर्न होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नंदुरबारचा रहिवाशी असलेले आणि सध्या अहमदाबाद, गुजरात येथे जीएसटी मुख्य आयुक्त असणारे चंद्रकांत वळवी, त्याच्या कुटुंबीयांनी, नातेवाईक अशा एकुण १३ जणांनी झाडाणी (ता. महाबळेश्वर) हे संपूर्ण गाव खरेदी केले आहे. यातून तेथील ६२० एकराचा भूखंड बळकावल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६, वन (संरक्षण) अधिनियम, १९७६ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ सारख्या अनेक महत्त्वपूर्ण कायद्यांचे राजरोसपणे नियमित उल्लंघन होत आहे. हा चिंतेचा विषय आहे. या कायद्यांचे उल्लंघन नैसर्गिक संपत्ती आणि पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण करते. या उल्लंघनांचे गंभीर परिणाम होत आहेत, ज्यात जैवविविधतेचा ऱ्हास, हवा आणि जल प्रदूषण, आणि हवामान (पान ४ वर)

## मोदींच्या सभेसाठी शासकीय यंत्रणेचा वापर केल्याचा अंबादास दानवेंचा आरोप

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- राज्यात लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असून लोकसभा निवडणुकीसाठी काही ठिकाणी प्रचार सुरु आहे. तर काही ठिकाणी मतदान पार पडले आहे. 'लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आदर्श आचारसंहिता जाहिर करण्यात आलेली आहे. असं असताना प्रभारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या डागडूजीची कामे करण्यात येत असून स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येत आहे. एकप्रकारे हा निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. त्यामुळे याप्रकरणी चौकशी करुन आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर नियमांनुसार उचित कारवाई करावी', अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे. दानवेंनी पत्राद्वारे ही मागणी केली आहे.

देशभरात स्वतंत्र आणि निष्पक्ष (पान ४ वर)

## नकली कोण आणि असली कोण हे चार तारखेनंतर कळेलच, रोहित पवारांचा मोदींवर पलटवार

नाशिक दि.१५ (प्रतिनिधी)- आज नाशिकच्या पिंपळगाव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे आणि डॉ. भारती पवार यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. या सभेतून त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली. नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादीचे काँग्रेसमध्ये नक्की विलिनीकरण होणार, असे त्यांनी म्हटले. आता यावरून आमदार रोहित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे.

रोहित पवार म्हणाले की, नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघात १३ लाख मतदार कांदा उत्पादक शेतकरी आहेत. त्या व्यतिरिक्त द्राक्ष उत्पादक आणि अन्य उत्पादक वेगळे आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोदींच्या सभेत बंदी केली असेल तर मोदींचा आणि भाजपचा विश्वास मतदारांवर देखील राहिलेला नाहीये.

त्यांना फक्त शो बाजी करायची होती. आम्ही सभा घेऊ शकतो हे दाखवायचं होतं. मोदींच्या पिंपळगावच्या सभेत धुळे, नगरहून लोकं आणली गेली, असा आरोप रोहित पवार यांनी केला. तर मतदार कमी आणि कार्यकर्ते काही प्रमाणात अशी परिस्थिती मोदींच्या सभेला होती. मोदींच्या आजच्या सभेत कुठेही उत्साह नव्हता, मोदींनी देखील भाषण आवरते घेत तिथून काढता पाय घेतला, असा टोला त्यांनी यावेळी लगावला.

पंतप्रधान मोदींनी शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेवर रोहित पवार म्हणाले की, मोदींच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात शेतकऱ्यांचं इथे भलं झाल्याचं आपण पाहिले आहे का? शेतमालाला भाव नाही, (पान ४ वर)

## न्यूज क्लिकच्या संपादकांची अटक अवैध; सर्वोच्च न्यायालयाने दिले तात्काळ सुटका करण्याचे आदेश

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- न्यूज क्लिकचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या सुटकेचे आदेश दिले आहेत. प्रबीर पुरकायस्थ यांच्यावर काही दिवसांपूर्वी युएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर त्यांना दिल्ली पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. दिल्ली पोलिसांनी युएपीए अंतर्गत केलेल्या कारवाईला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती.

या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडल्यानंतर बुधवारी न्यूजक्लिकचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना न्यायालयाने सोडण्याचे आदेश दिले. न्यूजक्लिक या वृत्त संकेतस्थळाने चीनकडून बेकायदा निधी घेतल्याचा आरोप आहे. तसेच चिनी प्रचारासाठी न्यूजक्लिकला कोट्यवधी रुपयांचा विदेशी निधी मिळाल्याचा आरोप आरोपपत्रात करण्यात आला होता. हा निधी अमेरिकेच्या मार्गाने पुरवण्यात आल्याचं एफआयआरमध्ये नमूद करण्यात आले होते.

## करकरे, साळसकर, कामटेंचा जीव घेणाऱ्या गोळ्या कसाबच्या होत्या? की त्यांचा खून झाला? उज्ज्वल निकम यांनी सत्य सांगावे; प्रकाश आंबेडकरांचे आव्हान

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- २६/११ दहशतवादी हल्ल्यात हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे यांचा जीव घेणाऱ्या गोळ्या कसाबच्या होत्या का की त्यांचा खून झाला? यासंदर्भात उज्ज्वल निकम यांनी सत्य सांगावं, असं आव्हान वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मागच्या पत्रकार परिषदेत उत्तर मध्य मुंबईचे उमेदवार उज्ज्वल निकम यांना प्रश्न विचारले होते. मुंबईवर हल्ला झाला होता, त्यासंदर्भात प्रश्न विचारले होते. हेमंत करकरे, साळसकर, कामटे यांचा हल्ल्यात गोळ्या लागून मृत्यू झाला होता. गोळ्या कोणाच्या होत्या, कसाब किंवा अबु ईस्माईलच्या बंदुकातल्या होत्या का? यासंदर्भात खुलासा करावा, अशी विनंती केली होती. देशाशी इमान राखावा, यासाठी खुलासा करणं आवश्यक आहे. असंही त्यांनी म्हटलं आहे.

उज्ज्वल निकम यांनी केस चालवली, त्यात दुमत नाही. कसाबला दोषी करण्यात आलं होतं. ३०२ कलमाअंतर्गत नारायण सोळंकी, रहमतुल्ला इब्राहिम, अंबादास पवार, अब्बास अन्सारी, तुकाराम ओंबळे ह्या सात जणांना खुनाच्या गुन्ह्यात दोषी धरलं गेलं. आयपीएस अधिकाऱ्यांचा देखील खून झालाय, मात्र फायनल ऑर्डरमध्ये त्यांची नावंच नाहीयत. काही अधिकारी यात होते, त्यात कोर्टमार्शल, ही माहिती का आणली नाही, हा प्रश्न आहे. कसाब आणि इस्माईलनं वापरलेल्या बंदुकीतून त्यांनी कुठल्यातरी धार्मिक संघटनेला वाचवण्यासाठी दबाव होता का? असा सवाल आंबेडकरांनी उपस्थित केला आहे.

आता तुम्ही उमेदवार आहात. आता कोणाचा देखील तुमच्यावर (पान ४ वर)

## माधवीराजे सिंधिया यांचे दीर्घ आजाराने निधन

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या आई माधवीराजे सिंधियांचे निधन झालं आहे. बुधवारी दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मावली. आज सकाळी ९ वाजून २८ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. सिंधिया कुटुंबाच्या राजमाता मागच्या काही दिवसांपासून व्हेंटिलेटरवर होत्या. माधवीराजेंवर मागच्या तीन महिन्यांपासून दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांना निमोनिया झाला होता.



गुरुवारी ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या मातोश्री माधवीराजे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत, अशीही माहिती मिळते आहे. माधवीराजे सिंधिया यांनी वयाच्या ७० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. माधवीराजे नेपाळच्या राजघराण्याशी संबंधित होत्या. १९६६ मध्ये त्यांचा विवाह माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया यांच्याशी झाला होता. माधवीराजे यांचे आजोबा जुद्ध समशेर बहादूर हे नेपाळचे पंतप्रधान होते. लग्नापूर्वी माधवीराजेंचं नाव राजलक्ष्मी असं होतं.

## इस्त्रायल विरोधात दक्षिण आफ्रिकेची आंतरराष्ट्रीय कोर्टात याचिका

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- हमाससोबत युद्ध करणारा इस्त्रायल आता काहीसा तणावात असल्याचे दिसत आहे. इस्त्रायलविरुद्ध आंतरराष्ट्रीय न्यायालयात १६ आणि १७ मे रोजी एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी होणार आहे. गाझा पट्टीमध्ये मारल्या गेलेल्या लोकांच्या प्रकरणी दक्षिण आफ्रिकेने याचिका दाखल केली आहे. यामध्ये इस्त्रायलचे राष्ट्राध्यक्ष बेंजामिन नेतन्याहू यांच्यावर कारवाई करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. पॅलेस्टाईनच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने गेल्या वर्षी २९ डिसेंबर रोजी इस्त्रायलवर कारवाई करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. यामध्ये पॅलेस्टाइन लोकांच्या हक्कांचे गंभीर नुकसान होत असल्याच्या मुद्द्यावर भर देण्यात आला आहे. तसेच इस्त्रायलला शिक्षा देण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे.

पॅलेस्टाइन नागरिकांची गाझातील सध्याची परिस्थिती १९४८ च्या अरब-इस्त्रायल युद्धापेक्षाही भयंकर असल्याचा दावा करण्यात येत आहे. अरब-इस्त्रायल युद्धापूर्वी आणि दरम्यान सुमारे सात लाख पॅलेस्टाइन नागरिकांना पळून जावे लागले होते. ७ ऑक्टोबर रोजी इस्त्रायलवर हमासच्या हल्ल्यानंतर गाझामध्ये सुरू झालेल्या युद्धात ३५,००० पॅलेस्टिनी मारले गेल्याचे स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले होते. हमासच्या हल्ल्यात सुमारे १,२०० इस्त्रायली नागरिक मारले गेले. युद्धामुळे गाझाच्या एकूण लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकांना सुमारे १७ लाख लोकांना आपली घरे सोडून पळावे लागले. १९४८च्या युद्धापूर्वी आणि दरम्यान स्थलांतरित झालेल्या लोकांच्या संख्येपेक्षा ही संख्या दुप्पट आहे.

## नक्षलवाद्यांकडून ३० मे रोजी गडचिरोली बंदचे आवाहन

गडचिरोली दि.१५ (प्रतिनिधी)- छत्तीसगडमधील अबुझमाडच्या जंगलात झालेल्या चकमकीत ठार झालेला नक्षल नेता जोगन्ना व इतर सहकाऱ्यांच्या स्मरणार्थ नक्षलवाद्यांनी ३० मे रोजी गडचिरोली बंदचे आवाहन केले आहे. यासंदर्भात नक्षल्यांच्या दांडकारण्य पश्चिम सबझोनल समितीचा प्रवक्ता श्रीनिवास याने नुकतेच एक पत्रक काढले आहे.

गडचिरोलीपासून १५ ते २० किलोमीटर अंतरावरील नारायणपूरच्या कांकेर सीमावर्ती भागात महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला छत्तीसगड पोलीस व नक्षलवाद्यांत चकमक झाली होती. यात ठार झालेल्या दहा नक्षलवाद्यांत जहाल नक्षलवादी जोगन्ना, विनय, मलेश, सिंधू गावडे, सरिता जेट्टी आणि शिल्का यांचा समावेश होता. गडचिरोलीतील (पान ४ वर)

## मोदी जे बोलतात तेच करतात; एकनाथ शिंदेंची स्तुतीसुमने

ठाणे दि.१५ (प्रतिनिधी)- नरेंद्र मोदींचा आतापर्यंतचा राजकीय प्रवास म्हणजे हरिवशंराय बच्चन यांच्या अग्निपथ कवितेप्रमाणे असून ते जे बोलतात ते करतात अशी स्तुतीसुमनं राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उधळली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या करिष्मा असा आहे की आपण आता कल्याण, ठाणे आणि भिवंडी या तीनही जागा जिंकतोय असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, वाराणसीमधील जनता ही मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी किती आतुर झाली आहे हे पाहिलं आहे. त्याचा आम्हाला अभिमान वाटला. वाराणसीमध्ये त्यांची लोकप्रियता पाहिली आणि त्या ठिकाणी उपस्थित राहण्याचं भाग्य मिळाल्याचाही अभिमान वाटलं. मोदीना ज्या ज्या वेळी भेटतो त्यावेळी हरिवंशराय बच्चन यांच्या (पान ४ वर)

# जाहिरातींचा मारा करी ग्राहकांचा कोंडमारा!

चित्रवाहिन्यांवरील कार्यक्रमादरम्यान किती जाहिराती दाखवाव्यात, किती वेळ दाखवाव्यात याबद्दल काही नियम, कायदे असले तरी ते पाळले जात नाहीत. लहान मुलांसाठीच्या कार्यक्रमांमध्ये जाहिराती, बातम्यांमध्ये जाहिराती, चर्चासत्रादरम्यान जाहिराती! जाहिरातींचा हा मारा ग्राहकांनी किती सहन करायचा? एखाद्या वाहिनीवर जाहिराती सुरू झाल्याचे पाहून चॅनल बदलावा तर तेथेही पुन्हा जाहिरातीच! यात बदल हवा असेल तर ग्राहकांनी संघटित होण्याशिवाय पर्याय नाही.

सध्याचे युग जाहिरातींचे आहे, असे सर्वत्र बोलले जात असले तरी या जाहिरातींमुळे ग्राहकांचा कसा कोंडमारा होतो, त्यांची कशी फसगत होते, जाहिरातींना बळी पडून खाद्यपदार्थ खरेदी करणाऱ्या ग्राहकांना भविष्यात गंभीर आजारांना कसे बळी पडावे लागते याचा फारसा विचार करताना कुणी दिसत नाही.

फसव्या जाहिरातींना भुलल्याने लहान बालके, शाळकरी मुले- मुली यांचे आरोग्य कसे धोक्यात येते, याकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसते. दूरचित्रवाणीवर एखादा कार्यक्रम रंगात आलेला असताना त्या रंगाचा बेरंग करणाऱ्या जाहिराती झळकू लागल्या की जो मनस्ताप होतो, त्याबद्दल बोलणार कुणाशी? चित्रवाहिन्यांवरील कार्यक्रमादरम्यान किती जाहिराती दाखवाव्यात, किती वेळ दाखवाव्यात याबद्दल काही नियम, कायदे असले तरी ते किती पाळले जातात, हा एक संशोधनाचा विषय आहे.

लहान मुलांसाठीच्या कार्यक्रमांमध्ये जाहिराती, बातम्यांमध्ये जाहिराती, चर्चासत्रादरम्यान जाहिराती! जाहिरातींचा हा मारा ग्राहकांनी किती सहन करायचा? एखाद्या वाहिनीवर जाहिराती सुरू झाल्याचे पाहून चॅनल बदलावा तर तेथेही पुन्हा जाहिरातीच! सर्व चॅनल्समध्ये ग्राहकांना वेठीस धरण्यामध्ये किती ही एकवाक्यता! अलीकडील काळात तर सिनेमा, नाटके यांना वारेमाप प्रसिद्धी देणारे चित्रवाहिन्यांवरील कार्यक्रम पाहिले की त्याद्वारे प्रेक्षकांवर अमुक सिनेमा वा नाटक पाहायला हवे, असा अप्रत्यक्ष दबाव येत असल्याचेच दिसून येते. करमणुकीच्या नावाखाली अशी शुगरकोटेड गोळी कधी घशाखाली उतरते ते कळतदेखील नाही. असे कार्यक्रम आपणास वेठीस धरत आहेत, हे ग्राहकांच्याही लक्षात येत नाही.

दूरचित्रवाणीवर ज्या जाहिराती दाखवल्या जातात, त्याबद्दल काही नियम आहेत. ते नियम सरकारनेच आखून दिले आहेत. एका तासात १२ मिनिटांपेक्षा अधिक जाहिराती दाखविता कामा नयेत, असे हा नियम सांगतो. जाहिरातींसाठी प्रति तास १२ मिनिटांचे हे जे बंधन आहे ते 'ट्राय' म्हणजे टेलीकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाने घातले आहे. पण या बंधनात बदल करावा यासाठी जाहिरातदारांकडून, उत्पादकांकडून सरकारवर दबाव येऊ लागल्याच्या बातम्या माध्यमांमधून झळकू लागल्या आहेत.

वाहिन्यांचा प्रेक्षक आणि जाहिरातदार यांच्यात समतोल राहावा, हे लक्षात घेऊन खरे म्हणजे हे बंधन घालण्यात आले आहे. पण ते झुगारून टाकण्याचा डाव रचला जातोय की काय असे वाटू लागले आहे. पण हे बंधन राहायलाच हवे, असा मुंबई ग्राहक पंचायतीसह काही ग्राहकहितैषी संघटनांचा आग्रह आहे. लहान मुलांसाठी जे कार्यक्रम असतात त्यात तर भरपूर जाहिराती असतात. या जाहिरातींना लहान मुले चटकन बळी पडतात. संबंधित वस्तू वा खाद्यपदार्थ वा पेय आपणास हवेच, असा आग्रह ही मुले आपल्या पालकांकडे धरतात. पालकही मुलांचा हट्ट पुरवितात. पण असे हट्ट पुरवून आपण आपल्या मुलांना संकटात टाकत आहोत, हे त्यांच्या लक्षातच येत नाही. आपल्याकडे लहान मुलांच्या कार्यक्रमांत कुठल्या जाहिराती दाखवाव्यात, किती वेळ दाखवाव्यात, याला काही धरबंद नाही. ऑस्ट्रेलियासारख्या देशात लहान मुलांसाठीच्या कार्यक्रमांमध्ये जाहिराती दाखविण्यास बंदी आहे.

आपल्याकडे सणासुदीचे दिवस म्हणजे जाहिरातदारांसाठी पर्वणीच असते. वाहिन्या, वृत्तपत्रे यातून जाहिरातदार आपल्या उत्पादनांचा ग्राहकांवर नुसता मारा करत असतात. त्या जाहिरातींना ग्राहक बळी पडतात, हे ओघानेच आले. अशा जाहिरातींवर बंधने घातली जाण्याची शक्यता आपल्या देशात तूर्त जरी दिसत नसली तरी न्यूझीलंडसारख्या देशात ख्रिसमस, गुड फ्रायडे, ईस्टर संडे आणि अन्य काही सुट्टय़ांच्या दिवशी चित्रवाहिन्यांवर जाहिराती करण्यास पूर्णपणे बंदी आहे. तसेच आरोग्यास अपायकारक अशा मद्यासारख्या पेयांच्या जाहिराती करण्यासही तेथे बंदी आहे.

आपल्याकडे दिवाळी, होळी, ख्रिसमस, ईद आदी सणांच्या दरम्यान चित्रवाहिन्यांवरील जाहिरातींच्या प्रदर्शनावर 'ट्राय' बंदी आणेल काय? उत्तर न मिळणारा असा हा प्रश्न आहे.

एखाद्या लाईव्ह कार्यक्रमात किती आणि कधी जाहिराती दाखवाव्यात हेही आपल्याकडे पाहिले जात नाही. कार्यक्रम ऐन रंगात आलेला असताना मध्येच कमर्शियल ब्रेक घेऊन प्रेक्षकांचा रसभंग झाल्याची अनेक उदाहरणे घडताना तुम्ही आम्ही अनुभवत असतो. पण ग्राहकाचा आवाज संघटित नसल्याने त्याला यासंदर्भात काहीच करता येत नाही.

चित्रवाहिन्यांवरील जाहिराती आणि त्यांचा कालावधी याबाबत अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटनसारख्या देशांमध्ये कायद्याने तरतुदी केल्या आहेत. पण आपल्याकडे? मोठे प्रश्नचिन्ह! केवळ चित्रवाहिन्यांवर दाखविल्या जाणाऱ्या जाहिरातींसंदर्भात आपल्या देशात सध्या काय स्थिती आहे याची यावरून थोडीशी कल्पना यावी. सर्व समस्या सोडवायच्या असतील तर ग्राहकांनी संघटित होण्याशिवाय पर्याय नाही. समर्थ ग्राहकशक्ती उभी राहिली, तरच या जाहिरातींच्या या कोंडमाऱ्यातून सुटका होऊ शकते. अन्यथा नाही!

# मुंबई म्हणजे मिनी इंडिया पण...

**अठराव्या** लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाच्या पाचव्या टप्प्यात देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील सहा मतदारसंघांत येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात महाराष्ट्र एकीकरण समितीने केलेल्या अभूतपूर्व आंदोलनानंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील काँग्रेस सरकारला महाराष्ट्राला राजधानी म्हणून मुंबई देणे भाग पडले. बेळगाव, कारवार, निपाणी, धारवाड, हुबळीसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न आजवर पूर्ण झाले नाही. कर्नाटक व गुजरात सीमेवरील मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात समावेश झाला नाही. गेल्या ६४ वर्षांत सीमा आंदोलनाची तीव्रता हळूहळू संपुष्टात आली. पण मुंबई ही महाराष्ट्राला काही सुखासुखी मिळालेली नाही, याचे मराठी माणसाला कधीच विस्मरण होणार नाही. मुंबईसाठी तब्बल १०६ जणांनी हौतात्म्य पत्करले आहे, हे मराठी माणूस कधीच विसरू शकत नाही. मुंबई महाराष्ट्राला मिळावी म्हणून हजारो जणांनी तुरुंगवास पत्करला. लाठीमार व गोळीबारात शेकडो जणांनी रक्त सांडले, हेही कधी विसरता येणार नाही. म्हणूनच मुंबई कॉस्मोपॉलिटीन आहे किंवा मुंबई म्हणजे मिनी इंडिया आहे, हे जरी मुंबईचे वैभव असले, तरी मुंबईवर पहिला हक्क मराठी माणसाचा आहे. म्हणूनच लोकसभा निवडणुकीत मुंबईचे खासदार कोण असणार, या प्रश्नाला मुंबईकरांच्या दृष्टीने महत्त्व आहे.

मुंबई प्रेस क्लब, फ्रि प्रेस जर्नल, प्रजा फाऊंडेशन आणि इंडियन मर्चंटस चेंबरच्या वतीने लोकसभा निवडणुकीतील प्रमुख पक्षांच्या मुंबईतील उमेदवारांबरोबर संवादाचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. या



कार्यक्रमात उमेदवारांना ते खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर मुंबईसाठी आणि मुंबईकरांसाठी काय करणार, हेच प्रश्न प्रामुख्याने विचारले गेले. शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेली तोडफोड सामान्य जनतेला पसंत पडलेली नाही; पण अशा राजकीय उलाढालींपेक्षा मुंबईची वाढलेली लोकसंख्या, बेसुमार वाढलेली वाहनांची संख्या, वाहनांची सर्वत्र होणारी कोंडी, उपनगरी प्रवासात लोकलमधील जीवघेणी गर्दी, घरांच्या गगनाला पोहोचलेल्या किमती, मेट्रो किंवा उपनगरी रेल्वेच्या विस्ताराची मंद गती, मुंबईतील पाणीपुरवठा व डम्पिंग ग्राऊंड्समुळे उद्भवलेल्या समस्या, बंद पडलेले शेकडो कारखाने, उद्योग व यातून निर्माण झालेली सुशिक्षितांची बेरोजगारी, अनेक मोठ्या व प्रतिष्ठित उद्योग-व्यवसायांचे मुंबईतून गुजरात व अन्यत्र झालेले स्थलांतर, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, महिलांची सुरक्षा अशा मुद्द्यांमध्ये राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार यांची काय भूमिका आहे, हे मुंबईकरांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे आहे.

निवडणूक प्रचारात आणि वसाहतींमध्ये फिरताना राजकीय पक्षांचे उमेदवार मुंबईकरांच्या प्रश्नावर बोलतात; पण खासदार म्हणून निवडून गेले की, अनेकांचे दर्शन होणेही दुरापास्त असते. निवडून गेल्यानंतर लोकप्रतिनिधींना मध्यस्थ, दलाल आणि त्यांच्या निकटवर्तीयांनी घेरलेले असते, हाच अनुभव वेळोवेळी येत असतो. म्हणूनच मुंबईकरांना उपलब्ध असलेला व मुंबईकरांना सहज भेटणारा, त्यांचे म्हणणे ऐकून घेणारा आपला खासदार हवा आहे. मनोज कोटक किंवा गोपाळ शेट्टी तसेच अगोदर मनोहर जोशी किंवा राम नाईक अशी काही नावे सांगता येतील की, जनतेसाठी ते वेळ राखून ठेवत असत व लोकांना नियमित भेटत असत. आदर्श लोकप्रतिनिधी कसा असावा, असे कोणी विचारले की रामभाऊ म्हाळगी आणि राम नाईक यांची नावे लगेच पुढे येतात. मग आताच्या लोकप्रतिनिधींना तसे वागणे का जमत नाही?

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने, आंतराष्ट्रीय वित्तीय केंद्र हे मुंबईत होणार होते; पण ते महाराष्ट्राबाहेर हलवले गेले. एका लाखापेक्षा जास्त रोजगार देणारा व १ लाख ५४ हजार कोटींचा 'वेदांत फॉक्सकॉन' प्रकल्प महाराष्ट्रात येणार होता, जागाही निश्चित झाली होती, तोही राज्याबाहेर गेला, त्याची चर्चा या निवडणुकीत नाही. 'टाटा एअर बस' हा २२ हजार कोटींचा प्रकल्प नागपूरला होणार होता, तो शेजारच्या राज्यात गेला. मुंबईचे डायमंड मार्केटही बाजूच्या राज्यात हलविण्यात आले, गेल्या दहा वर्षांत किती प्रकल्प मुंबई महाराष्ट्रातून बाहेर गेले, यावर मावळत्या लोकसभेत कोणी किती प्रश्न विचारले, याचा शोध घ्यावा लागेल. विशेष म्हणजे क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामनाही मुंबईला डावलून गुजरातला झाला. महानंद दूध डेअरी मदर डेअरीकडे चालवायला दिली गेली. मुंबईचे खासदार अशा विषयांवर काहीच बोलणार नाहीत का? देशाला सर्वाधिक म्हणजे ६० टक्के कस्टम ड्युटी, ४० टक्के महसूल, सर्वाधिक जीएसटी मुंबईतून जातो. मग मुंबईला त्या बदल्यात काय मिळते? म्हणूनच केंद्राकडून मुंबईला आपला हक्काचा वाटा खेचून आणणारा खासदार असावा, अशी मुंबईकरांची

भावना आहे.

आज मुंबईच्या लोकसंख्येत एक कोटीपेक्षा जास्त अमराठी आहेत. सर्वाधिक उत्तर भारतीय आहेत. रोजगाराच्या शोधात परप्रांतीयांचे लोंढे वर्षानुवर्षे मुंबईवर आदळत आहेत. घटनेनुसार देशातील नागरिकांना कुठेही स्थलांतरीत होण्याचा अधिकार आहेच; पण या सर्व परप्रांतीयांच्या गर्दीला मुंबईने आपलेसे करून घेतले आहे. मग मुंबईला केंद्राकडून विशेष जादा निधी किती मिळतो, हे सुद्धा कळायला हवे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नावाखाली मुंबईत 'एसआरए' सुरू होऊन दोन-अडीच दशके उलटली. झोपटपट्टीवासीयांना मोफत घरांची मालिका अखंड चालूच आहे. झोपडपट्टीच्या जागांवर शेकडो उत्तुंग टॉवर्स उभे राहिले. 'एसआरए'नंतरही झोपडपट्ट्या कमी झाल्या असे नाही. आजही ६०-६५ लाख लोक झोपडपट्टीत राहत आहेत. यातून सरकारला काय मिळाले? कमिशन, भ्रष्टाचार मात्र सर्व पातळीवर वाढला. देशाच्या आर्थिक राजधानीला झोपडपट्ट्यांचा विळखा आहे, हे किती वर्षे चालू राहणार आहे? मुंबई विमानतळाला ४० हजार झोपड्यांनी घेरले आहे, असे जगात कुठे नाही; पण केंद्रात व राज्यात कुणाचे सरकार आले, तरी विमातळाभोवताली असलेली झोपडपट्टी कुणाला हटवता आलेली नाही. मोदी सरकारच्या काळात दहा वर्षांत विविध शहरांत विमानतळांची संख्या वाढली, हे चांगलेच आहे. मग नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दोन दशके कशामुळे व कुणामुळे रखडला आहे? हे प्रश्न तडफेने मार्गी लावणारे खासदार मुंबईकरांना हवे आहेत.

मुंबईची लोकल ही या महानगराची जनवाहिनी आहे. सीएसटी-चर्चगेटपासून ते कर्जत-कसारा-खोपोली-पालघर-डहाणूपर्यंत उपनगरी सेवा धावत आहे. रोज लोकल्समधून ७५ लाख मुंबईकर प्रवास करतात. रेल्वे प्रवाशांची काळजी घेणारा खासदार मुंबईकरांना पाहिजे आहे. रोज खचाखच गर्दीने भरलेल्या लोकल्स सकाळ-संध्याकाळ धावताना दिसतात. १२-१५ डबेही अपुरे पडतात. एसी लोकल्सने सामान्य लोकल्सचे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. मध्य रेल्वेवरील लोकल्स रोज १५ ते २० मिनिटे उशिरा धावतात. जो मेट्रोला वक्तशीरपणा आहे, तो लोकल्सला का नाही? फर्स्ट क्लासमध्ये विनातिकीट प्रवाशांची गर्दी असते, महिलांच्या डब्यात घुसखोरी असते, रेल्वे फलाटावर कुत्री मोकाट असतात, लोकल्समध्ये भिकारी व फेरीवाले मुक्त फिरत असतात, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी खासदारांनी रेल्वे प्रशासनाकडे प्रयत्न करावेत, अशी मुंबईकराची माफक अपेक्षा असते. रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर तिकीट किंवा पासशिवाय प्रवेश मिळणार नाही, अशी व्यवस्था का होऊ शकत नाही? गेल्या काही वर्षांत रेल्वे प्लॅटफॉर्मवर खाद्य पदार्थांच्या स्टॉल्सची संख्या वाढलेली आहे. त्याची काही गरज आहे का? बरे, त्यात मराठी विक्रेते तरी आहेत का? खरे तर दादर, कुर्ला, ठाणे, अंधेरी या स्टेशन्सवरती नेहमीच मोठी गर्दी असते, लोकांना धड चालायला रस्ता नसतो. मग खाण्या-पिण्याची दुकाने हवीत कशाला?

मुंबई महापालिकेची मुदत संपून दोन वर्षे झाली. मुंबईकरांना नगरसेवकच नाहीत, राज्यातील सर्व महापालिकांची हीच अवस्था आहे. काही महापालिकांची मुदत संपून तीन साडेतीन वर्षे झाली, तरी तेथे निवडणूक नाही. या विषयावर कोणताही राजकीय पक्ष आग्रही नाही. महानगरातील जनतेला नगरसेवक नसल्याने व सर्वत्र 'बाबूराज' चालू असल्याने स्थानिक प्रश्नही लोकसभा उमेदवारांच्या पुढेच मांडले जात आहेत. 'अटल सेतू', 'कोस्टल रोड', 'मेट्रो', 'धारावी पुनर्वसन प्रकल्प' असे विकासाचे अनेक प्रकल्प आहेत. त्याची गरजही होती व आहे. पण देशाची राजधानी नवी दिल्लीच्या तुलनेने मुंबईकडे केंद्राचे लक्ष कमी आहे. मुंबईकरांचा आवाज उठवणारा खासदार लोकसभेत असावा व मुंबईकरांना 'अच्छे दिन' यावेत, हीच मतदारांची इच्छा आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# उन्हाळा... प्रकृती सांभाळा

**उन्हाळ्यामध्ये** नागरिकांनी उष्मा लाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता काय करावे

१. पुरेसे पाणी प्या. तहान लागली नसली तरीही दर अर्धा तासाच्या फरकाने पाणी प्या.

२. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा.

३. दुपारी बारा ते तीन वाजे दरम्यान अनावश्यक कामासाठी घराबाहेर पडणे टाळा.

४. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा.

५ उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा

६. हलकी पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत

७. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे

८. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकण्यात यावा.

९. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस., घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी, ताक इत्यादीचा वापर नियमित करावा

१०. अशक्तपणा डोकेदुखी सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा चटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा...

११. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पाणी देण्यात यावे

१२. घर थंड ठेवण्यासाठी पडदे शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात

१३. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे

१४. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. १५. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे.

१६. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा तसेच बाहेर कामकाज करीत असल्यास

मध्ये मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करण्यात यावा.

१७. गर्भवती आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी,

१८. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या एअर्शेंपू या ट्विटर व फेसबुक व ॲप वरील सूचना पाहाव्यात

१९. जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचना पाहाव्यात

उन्हाळ्यामध्ये नागरिकांनी उष्मा लाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता काय करू नये

१. उन्हात अति कष्टाची कामे करू नका

२. मद्य, चहा कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेय घेऊ नका

३ दुपारी बारा ते तीनच्या दरम्यान घराबाहेर पडणे टाळा

४. उच्च प्रथिनेयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका.

५. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये

६. गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे

७. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी.

८. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराच्या खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात.

# अवैध होर्डिंग्जचा बाजार महाराष्ट्रातील अनेक शहरांत; सावधान!

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - परिसरात सोमवार दिनांक १३ मे २०२४ ला वादळीवारा व पाऊस आला यामध्ये मोठ्या प्रमाणात मुंबईकरांचे नुकसान झाले.त्याचप्रमाणे स्थानिक प्रशासन व सरकारच्या हलगर्जीपणामुळे मुंबईत असलेल्या अवैध होर्डिंग्जने १४ मुंबईकरांचा बळी घेतला व ८० पेक्षा जास्त गंभीर जखमी झालेत. त्याचबरोबर होर्डिंग्जखाली अनेक वाहने दबलीत व मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली.महाराष्ट्रात जणुकाय होर्डिंग्जची शर्यत लागली की काय असे दिसून येते. परंतु यात निरअपराध लोकांचा बळी गेला त्याचे काय?यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.महापालिका जाहिरातदारांना अवैध होर्डिंग्ज बद्दल नोटीस बजावुन सुध्दा होर्डिंग्ज हटत नसेल तर सर्वसामान्य नागरिकांनी काय करावे?मनपाने नोटीस बजावल्या नंतर प्रशासनाने कठोर कारवाई केली असती तर यदाकदाचित १४ निरअपराध लोकांचा जीव वाचला असता.अवैध होर्डिंग्जवरून असे लक्षात येते की जाहिरातदार व मनपा प्रशासन यात काही साठगाठ तर नाही ना!अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने सर्वत्र आपल्याला होर्डिंग्ज मोठ्या प्रमाणात दिसून येते. होर्डिंग्ज असावेत ते कायद्याच्या चौकटीतून व नियमानुसार असावेत.परंतु अवैध होर्डिंग्जची संख्या वाढल्याने मुंबईत १४ लोकांना आपले प्राण गमवावे लागलेत.यावर प्रशासनाने व सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.स्थानिक प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आपल्याला मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात अवैध होर्डिंग्जचा बाजार दिसून येते.असेही अवैध होर्डिंग्ज राज्यात आपल्याला पहायला मिळतात जसे की नगरसेवक,आमदार, खासदार, मंत्रीसह अनेक राजकीय पुढाऱ्यांचे अतोनात होर्डिंग्ज सूध्दा आपल्याला मोठ्या प्रमाणात पहायला मिळतात. होर्डिग्ज असे लावतात की राज्यात त्यांना कोणीच ओळखत नसावे.राजकीय पुढाऱ्यांचे आगमन व वाढदिवस याचे होर्डिंग्ज तर जिथे जागा मिळेल तिथे लावलेले आपण पहातो.

इलेक्ट्रिक पोल सुध्दा यांना कमी पडतात,तसेच प्रत्येक चौका-चौकात अवैध ठीकाणी होर्डिंग्ज दिसतात. होर्डिंग्जच्या अशाही घटना पहायला मिळतात की लोकांचे लक्ष अचानक होर्डिंग्जकडे जाते अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत आणि आता तर जाहिरातदारांनी जीव घेणे होर्डिंग्ज लावने सुरू केल्याचे दिसून येते.यावरून स्पष्ट होते की जाहिरातदारांना सर्वसामान्यांच्या जीवाची अजीबात पर्वा नसावी,ही बाब मुंबईतील घाटकोपर येथील दुर्घटनेवरून दिसून येते.परंतु आता मुंबईतील दुर्घटना पहाता राज्यातील संपूर्ण महानगरपालिकांना जाग आल्याचे दिसून येते.नागपूर सुध्दा अवैध होर्डिंग्जच्या बाबतीत अग्रेसर आहे.शहरातील बाजारपेठ, मुख्य रस्त्यांवरील इमारती, शासकीय कार्यालय परिसर, याठिकाणी होर्डिंग्जचे मोठमोठे सांगाडे उभे आहेत. मागील आठवड्यात नागपूर शहरात मुसळधार पाऊस व वादळीवाऱ्यामुळे शहरातील होर्डिंग्जचे हालबेहाल झाले आहेत.परंतु दिनांक १३ मे ला घाटकोपरमध्ये होर्डिंग्ज पडून १४ जणांचा मृत्यू झाला व ८० पेक्षा जास्त जखमी झालेत. त्यामुळे नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये होर्डिंग्जच्या बाबतीत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घाटकोपरची घटना पहाता धोकादायक स्थितीत असलेले संपूर्ण शहरातील होर्डिंग्ज काढण्याचे आदेश स्थानिक प्रशासन व सरकारने ताबडतोब द्यायला हवेत. सोबतच अवकाळी पाऊस व येणारा पाऊसाळा पहाता राज्याच्या स्थानिक प्रशासनाने संपूर्ण होर्डिंग्जचे कसुन ऑडिट करायला हवे, जेणे करून घाटकोपर सारख्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही. त्यामुळे जाहिरातदार, स्थानिक प्रशासन व सरकार यांनी सर्वसामान्यांच्या दृष्टीकोणातुन होर्डिंग्जच्या बाबतीत 'जान है तो जहान है' हा मुलमंत्र जोपासायला हवा व अवैध होर्डिंग्जच्या बाबतीत कठोर कारवाई करावी.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# कर्जबाजारीपणा, मराठा आरक्षण मिळत नसल्याने तरुणाने संपविले जीवन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- कर्जबाजारीपणा व उपोषण करुनही मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने एका २५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज बुधवार (दि.१५) सकाळी वडगावात उघडकीस आली आहे.

दत्ता कालीदास महिपाल (रा.शिंदेवाडी, ता.माजलगाव, जि.बीड, ह.मु.वडगाव) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. आत्महत्या करण्यापूर्वी दत्ता याने त्याचा लहान भाऊ महेश याच्या व्हॉटसअ‍ॅप नंबरवर सुसाइड नोट पाठवली होती.

दत्ता महिपाल हा तरुण मुळचा बीड जिल्ह्यातील शिंदेवाडी येथील रहिवाशी असून काही दिवसापूर्वी तो रोजगाराच्या शोधात वाळूज उद्योगनगरीत आला होता. उद्योगनगरीत रोजगाराची संधी मिळाल्याने दत्ता हा वडगावातातील विलास शेजवळ यांच्या घरात भाड्याने एकटाच राहत होता. मंगळवारी रात्री ११.४५ वाजेच्या सुमारास दत्ता याने सुसाइड नोट लिहून लहान भाऊ महेशच्या व्हॉटसअ‍ॅप नंबरवर पाठविली होती. मात्र महेश हा झोपेत असल्याने तो वाचू शकला नाही.



दरम्यान, आज बुधवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास महेशने मेसेज पहिला. त्यानंतर घाबरलेल्या महेशने नातेवाईक अशोक सुरवसे यांच्याशी संपर्क साधत दत्ताकडे जाण्यास सांगितले. घरमालक आणि सुरवसे यांनी रूममध्ये पाहिले असता दत्ता गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. अत्यवस्थ दत्ता यास शासकीय रुग्णालयात दाखल केले. येथे डॉक्टरांनी तपासून दत्ताला मृत घोषित केले. या प्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

दत्ताने त्याचा लहान भाऊ महेश याच्या व्हॉटसअ‍ॅपवर पाठविलेल्या चिठ्ठीत, 'आय लव यु बद्रर अ‍ॅण्ड ऑल' तसेच मी काही कारणावरुन फाशी घेत आहे. माजलगाव येथील गोपाला अर्बन या बॅंकेकडून मी १ लाख रुपये कर्ज घेतले होते. पण काही हप्ते न भरल्याने बॅंकेकडून रोज फोन येत असल्याने मी खुप त्रस्त झालो होतो. मोठ्या बिझनेस वाले कर्ज घेतात व न भरता पळून जातात, विजय माल्या असेल किंवा निरव मोदी असेल त्यांना कुणी काही बोलत नाही. पण शेतकऱ्यांनाच सर्व बोलतात. दुसरे कारण मराठा आरक्षण मिळत नाही, कारण काय आहे, मी उपोषण करुन काय फायदा झाला नाही, सरकारने याची भरपाई करावी, स्वॉरी मम्मी-पप्पा सुखी रहा, तुमचा दत्ता'', असा मजकूर सुसाइड नोटमध्ये आढळून आला.

# महावितरणचे रमेश शिंदे आज आकाशवाणीवर

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- राज्य शासनातर्फे गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त महावितरणचे कर्मचारी रमेश काकासाहेब शिंदे यांची गुरुवारी (१६ मे) सायंकाळी ६.३५ वाजता आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावर मुलाखत प्रसारित होणार आहे.

कामगार सभा या कार्यक्रमात स्मिता नामदे यांनी घेतलेली ही मुलाखत आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून तसेच 'न्यूज ऑन एआयआर' या अ‍ॅपवरही प्रसारित केली जाणार आहे. शिंदे यांना काही महिन्यांपूर्वीच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेला आहे. महावितरणमध्ये २०११ पासून काम करणारे शिंदे सध्या हिवरा ३३ केव्ही उपकेंद्रात यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. महावितरणमधील उत्कृष्ट तांत्रिक कामांसोबतच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. ते छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील वाहेगाव देमणी येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन स्तरावर आपल्या अभिनय कौशल्याने विविध युवक महोत्सव, राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धा गाजवणाऱ्या शिंदेंनी महावितरणसह कामगार नाट्य स्पर्धा व राज्य नाट्य स्पर्धांतही विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. उत्कृष्ट व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक असलेल्या शिंदेंचे 'उद्योगाचा कणा : कामगार आणि वास्तव' हे पुस्तक प्रकाशित झालेले असून. कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कामगार चळवळीतही ते सक्रिय आहेत.

शिंदे यांना गतवर्षी मिरज येथे झालेल्या कामगार साहित्य संमेलनात कामगार कल्याण मंडळातर्फे वैचारिक लेखन व काव्य लेखनासाठी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच महावितरणच्या परिमंडल कार्यालयातर्फे त्यांना सहव्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते विशेष गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महावितरणतर्फेच त्यांना उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कारही मिळालेला आहे.

# विद्यापीठातील विभागांमध्ये 'सीईटी'नेच होणार प्रवेश; ऑनलाइन नोंदणी आवश्यक, प्रक्रिया सुरू

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व उपकेंद्रातील विभागांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश हे प्रवेश चाचणी परीक्षेच्या (सीईटी) माध्यमातून होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सीईटी परीक्षेसाठी १५ ते २५ मे दरम्यान नोंदणी केली जाणार असून, त्यानंतर ३ ते १४ जून दरम्यान संबंधित विभागांमध्ये ऑफलाईन पद्धतीने सीईटी होणार असल्याचे परिपत्रकाद्वारे विद्यापीठाने जाहीर केले आहे.

विद्यापीठाच्या २०२४-२५ शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार वेळापत्रक जाहीर केले आहे. सीईटीचे ५० टक्के आणि अंतिम वर्षाच्या ऐच्छिक विषयाचे ५० टक्के गुण ग्राह्य धरून गुणवत्तेनुसार संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित केला जाणार आहे. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ऑनलाईन नोंदणी होणार असून, सीईटी परीक्षाही स्वतंत्रपणे आयोजित केली आहे. सीईटी परीक्षा ही १०० गुणांची असणार आहे. त्यात एकूण ५० प्रश्न विचारले जातील. हे प्रश्न प्रत्येकी दोन गुणांचे असणार आहेत. या परीक्षेसाठी प्रत्येक विभागानुसार वेळ आणि दिनांक वेगवेगळा ठरविला आहे. विद्यार्थ्यांस एखाद्या विषयाच्या सीईटीला मुकावे लागू नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने काळजी घेतल्याचेही वेळापत्रकावरून स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार १५ ते २५ मे दरम्यान ऑनलाईन नोंदणी केली जाणार आहे. त्यानंतर ३ ते १४ जून दरम्यान विविध विभागांमध्ये सीईटी होईल. सीईटीचे निकाल १५ जून रोजी घोषित केले जातील. त्यानंतर सीईटी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अभ्यासक्रमांना प्रवेशसाठी १६ ते २६ जून दरम्यान ऑनलाईन नोंदणी करावी लागेल. त्याशिवाय पदवी परीक्षेच्या गुणांची कागदपत्रे विभागात जमा करावी लागतील. २९ जूनला प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहीर केली जाईल. त्यानुसार १ ते ३ जुलै दरम्यान संबंधित विभागात प्रवेश देण्यात येतील. ५ जुलैला दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होईल. १३ जुलैला जागा रिक्त राहिल्यास स्पॉट अ‍ॅडमिशनद्वारे प्रवेश दिले जातील. तसेच १५ जुलैपासून नियमित तासिकांना सुरुवात होणार असल्याचेही प्रशासनाने जाहीर केले आहे.

# पैठणी विक्रेत्यांच्या वारसांना २९ लाख रुपये द्या; मोटार अपघात न्यायधिकरणाचा आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- सहा वर्षापूर्वी झालेल्या कार अपघातप्रकरणी पैठणी विक्रेता मृतांच्या वारसांना २९ लाख ५ हजार रुपये ६.५ टक्के व्याजासह देण्याचे आदेश मोटार अपघात न्यायधिकरणाने दिलेत. चालक, मालक आणि टाटाएआयजी विमा कंपनीकडून ही रक्कम वसूल केली जाईल.

मृत मोहन अडसूळ यांच्या पत्नीच्या फिर्यादीवरून अहमदनगरच्या पारनेर पोलिस ठाण्यात कार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. न्यायालयाच्या या आदेशाने कुटुंब उघड्यावर आलेल्या पैठणी विक्रेत्यांच्या वारसांना मोठा आधार मिळाला आहे.

पैठण येथील मोहन पंढरीनाथ अडसूळ हे पत्नी व मुलासह त्यांचा मित्र चालक फकिरा गाढे यांच्यासह २१ जानेवारी २०१८ रोजी प्रवास करत होते. ते स्टॅंट्रो कारमधून कल्याण येथून पैठणला येत होते. मात्र, चालकाने गाडी वेगात चालवली. त्यामुळे त्याचे गाडीवरचे नियंत्रण सुटले. कार माळकुप गावच्या शिवारात (ता. पारनेर) अहमदनगर कल्याण रोडच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळली. या अपघातामध्ये मोहन अडसूळ यांचा मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी व कारचालक फकिरा गाडे हे गंभीर जखमी झाले.

अपघातात मृत झालेले मोहन अडसूळ यांचे वारस मुले, पत्नी यांनी कारचालक मालक व टाटा एआयजी इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुध्द छत्रपती संभाजीनगर येथील मोटार अपघात न्यायधिकरणात नुकसान भरपाई मिळावी यासाठी अ‍ॅड. संदीप बी. राजेभोसले, अ‍ॅड. बाळासाहेब नवले, अ‍ॅड. अनिल बोबडे यांचेमार्फत अर्ज सादर केला होता. अ‍ॅड. संदीप बी. राजेभोसले यांनी असा युक्तिवाद केला की, 'वेळोवेळी सूचना देऊनही कार चालकाने त्याच्या ताब्यातील कार भरधाव वेगात व निष्काळजीपणाने चालवली. त्यामुळे कारचा अपघात झाला. त्यात मोहन अडसूळ यांचा मृत्यू झाला. कारचालकाचा निष्काळजीपणा या अपघातास कारणीभूत ठरला. अपघातापूर्वी मृत मोहन अडसूळ पैठण येथे पैठणी साडी विक्री केंद्र चालवित होते. त्यातून कुटुंबाचा उदनिर्वाह करत होते. मात्र, त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंब उघड्यावर आले आहे.

होन्ही बाजूंचे म्हणणे, युक्तीवाद व पुरावे ग्राह्य धरून, मा. मोटार अपघात न्यायाधिकरणाचे सदस्य अश्विनी लोखंडे यांनी अर्जदारांना रु.२९,०५,०००/- (एकोणतीस लाख पाच हजार रुपये) ६.५ टक्के व्याजासह दावा दाखल झाल्याच्या दिनांकापासून देण्याचे आदेश दिले. या प्रकरणात प्रतिवादी, कारचालक, मालक व टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना प्रतिवादी करण्यात आले होते. अर्जदारांतर्फे अ‍ॅड. संदीप बी. राजेभोसले यांनी बाजू मांडली. त्यांना अ‍ॅड. फरना शेख, अ‍ॅड. दिनेश चव्हाण, प्रशांत गायकवाड, आनंद कदम यांनी सहकार्य केले.

# भाऊजीने केली मेहुण्याची हत्या; १२ तासात आरोपी जेरबंद

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- पत्नीला सासरी नांदायला पाठवत नसल्याने, भाऊजीने डोक्यात दांडा मारुन मेहुण्याचा खून केला. ही घटना (१३ मे) रोजी दुपारी अडीच वाजता करीमनगरातील गल्ली नंबर ६ मध्ये घडली.

संशयित हसनुद्दीन मोईद्दीन शेख व त्याचा मेहुणा हुसेन हारून शेख शहरातील करीमनगरात शेजारी शेजारी राहतात. संशयिताचे व त्याच्या पत्नीचे नेहमी भांडण होत असे. त्यामुळे गेल्या आठ महिन्यांपासून संशयिताची पत्नी मुलाला घेऊन माहेरी आई-वडील व भावाकडे राहते. काही महिन्यांपासून हे प्रकरण कौटुंबिक न्यायालयात सुरू आहे. संशयिताच्या मुलाच्या हाताचे हाड मोडल्याने तो आपल्या आईसह मुलास भेटण्यासाठी सोमवारी गेला होता. त्याचवेळी दोन्ही कुटुंबात जोरदार भांडण झाले. शेजारच्या नागरिकांनी भांडण सोडवले. त्यानंतर संशयित शेख घरी गेला व पुन्हा दांडा घेऊन सासरी आला. रागाच्या भरात हसनुद्दीन मोईद्दीन शेख याने त्याचा मेहुणा हुसेन हारून शेख याच्या डोक्यात लाकडी दांड्याने वार केला. त्यामुळे हुसेन शेख जागेवरच कोसळला. नातेवाइकांनी कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ.मनीषा गिते यांनी हुसेन यास तपासून मृत घोषित केले.

घटनेनंतर हसनुद्दीन मोईद्दीन शेख फरार झाला होता. मात्र कन्नड शहर पोलिसांनी १२ तासांत त्याला अटक केली. मंगळवारी दुपारी त्याला कन्नड दिवाणी न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

# डेंग्यू ताप टाळण्यासाठी खबरदारी घ्या

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- डेंग्यू ताप विशिष्ट विषाणुमुळे होतो. डेंग्यूचा प्रसार हा एडिस इजिप्टाय नावाच्या डासाच्या मादी मार्फत होतो. या डासाची उत्पत्ती साठवलेल्या स्वच्छ साठवून राहिलेल्या पाण्यात होते. कोणतेही पाणी आठ दिवसापेक्षा जास्त साठवून ठेवल्यास त्यामध्ये डास अंडी घालतात. त्यानंतर अंड्याचे रूपांतर डासात होते.कोणतेही साठविलेले पाणी हे आठ दिवसांपेक्षा जास्त ठेवू नये. याबाबत नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक असून डासाची उत्पत्तीवर नियंत्रण मिळविण्यासाठी नागरिकांनी आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेत राष्ट्रीय डेंग्यु दिन गुरुवार १६ मे रोजी साजरा होत आहे. डेंगीचा प्रसार हा एडिस इजिप्टाय नावाच्या डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती स्वच्छ साठवून राहिलेल्या पाण्यात होते. उदा. सिंमेट टाक्या, रांजण, प्लास्टिक रिकाम्या बादल्या, नारळाच्या करवंट्या, घरातील शोभेच्या कुंडया, निरपयोगी वस्तू, टायर्स व कुलर ईत्यादी. जास्त दिवस साठलेल्या ठिकाणी



एडिस इजिप्टाय डासाची मादी अंडी घालते. एक डास एकावेळी दिडशे ते दोनशे अंडी घालते व यातून या डासाचा मोठा फैलाव होतो.

नागरिकांनी दक्षता घेतल्यास डासाची उत्पत्ती होणार नाही व डास चावणार नाही. योग्य काळजी, वेळीच केलेला उपचार प्रत्येकाला होणाऱ्या आजारापासून दूर ठेवतो. त्यासाठी किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार लावून आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.

डेंग्यु संदर्भात India Fights Dengu हे मोबाईल अ‍ॅप्लीकेशन तयार केलेले आहे. त्याच प्रमाणे अ‍ॅन्ड्राईड मोबाईलवर PLAY STORE मध्ये जावुन India Fights Dengu हे अ‍ॅप शोधावे व मोबाईलवर ते डाऊनलोड करुन घ्यावे. यामध्ये डेंग्यु विषयी सर्व माहिती उपलब्ध आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर यांनी सांगितले की, डेंग्यू पसरवणाऱ्या अळया किंवा एडिस इजिप्ती प्रजातीचे डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात तयार होतात. त्यामुळं घरात एसी, फ्रीजखाली साचलेलं पाणी, फुलदाण्या, कूलर, कुंड्या, बादल्या, जुने टायर यांच्याकडे विशेष लक्ष ठेवा. तिथे खूप दिवस पाणी जमा होणार नाही, याची काळजी घ्या. घरात आणि आजूबाजूला स्वच्छता पाळणं सर्वांत महत्त्वाचं. डेंग्यूचे डास सामान्यतः दिवसाच चावतात, त्यामुळे तुमच्या आजूबाजूला पाणी साचलेल्या ठिकाणी जाणं टाळावच. घरांच्या खिडक्यांना जाळी लावणे, शक्यतो दारं-खिडक्या बंद ठेवणे, आणि खूप डास असल्यास त्यांची विल्हेवाट लावायला उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**मागील पाच वर्षांची डेंग्युची परिस्थिती पुढीलप्रमाणे**

| वर्ष | बाधीत रुग्ण |
|---|---|
| सन २०१९ | ५२७ |
| सन २०२० | ४८ |
| सन २०२१ | ११७ |
| सन २०२२ | १०८ |
| सन २०२३ | ४१५ |
| ३० एप्रिल २४ अखेर | २४ |

## (पान १ वरुन)

### राहुल गांधींकडून मंचावर....

सरकारच्या काळात शेतकऱ्यांसाठी खोटे पॅकेज जाहीर होत होते. या पॅकेजमधून शेतकऱ्यांना एक रुपया देखील मिळत नव्हता. नासिक आणि हा परिसर कांदा आणि द्राक्ष शेतीसाठी प्रसिद्ध आहे. देशामध्ये पहिल्यांदाच कांद्याचा बफर स्टॉक तयार करण्याची व्यवस्था आमच्या सरकारने सुरू केली, असा दावा नरेंद्र मोदी यांनी केला आहे. या आधी देखील अशी कोणतीच व्यव्यस्था नव्हती. गेल्यावर्षी शेतकऱ्यांकडून सात लाख टन कांदा खरेदी केला असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. आता पुन्हा पाच लाख टन कांदा ठेवण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. गेल्या काही वर्षात कांदा निर्यातीमध्ये ३५ टक्के वाढ झाली असल्याचेही नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. कांदा निर्यातीवर लावण्यात आलेले बंदी आता उठवण्यात आली आहे. तसेच कांदा निर्यातीवर देखील सरकार सबसिडी देत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

### कितीही सभा घ्या, रोड शो घ्या,..

होते. भाड्याची माणसे तिथं आली. मोदी भाषण करताना एका तरुणाने प्रश्न विचारला तर पंतप्रधान त्याच्याकडे रागाने पाहत भारत माता की जय म्हणत निघून गेले. मात्र तो शेतकरी रामाचा सुधा आहे आणि भारत मातेचे सुपुत्र आहे. जर तुम्ही काही न बोलता जात असाल तर या थापाड्याची देशाला गरज नाही. माझ्या शिवाय देशाला पर्याय नाही ही मोदींची घमेंड आहे. ती उतरविण्याची वेळ आता आलीय असे संजय राऊत म्हणाले.

### गुजरातच्या जीएसटी आयुक्तांनी....

बदल यांचा समावेश आहे.

सुशांत मोरे म्हणाले की, झाडाणी हे गाव सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्राच्या नजीकच वसले आहे. याठिकाणी घनदाट जंगल असल्याने येथे वन्यजीवांचा नैसर्गिक अधिवास आहे. झाडाणीतील एका पुनर्वसित शेतकऱ्याची भेट घेतली असता, त्याने तुमचे आता पुनर्वसन झाले आहे, तुमची मूळ गावातील जमीन शासन जमा होणार आहे. तरी ती शासन जमा होण्यापेक्षा आम्हाला द्या. आम्ही तुम्हाला पैसे देऊ असे म्हणत संबंधित सनदी अधिकाऱ्याने ८ हजार रुपये एकराने जमीन बळकावल्याचे सांगितले. एकूण भूखंडापैकी ३५ एकर क्षेत्रामध्ये भला मोठा जंगल रिसॉर्ट प्रकल्प उभा राहत आहे. यावेळी अनधिकृत बांधकाम, खोदकाम, वृक्षतोड व अंतर्गत जागेत अवैध रस्ते काढून, वन हद्दीतून वीज पुरवठा करून पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. गेल्या ३ वर्षापासून याठिकाणी अवैध बांधकाम, शेजारी मोठ्या प्रमाणात खाणकाम व उत्खनन सुरू आहे. मात्र, प्रशासनातल्या कोणत्याही घटकाला याची पुसटशी देखील कल्पना नसावी याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यामुळे तहसीलदार, तलाठी याठिकाणी कधीही फिरकत नसल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे.

### मोदींच्या सभेसाठी शासकीय....

निवडणूक व्हावी यासाठी निवडणूक आयोगाने मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्याप्रमाणे राज्यात सर्वत्र राजकीय पक्षांकडून त्यांचे पालन करुन नेत्यांच्या सभा सुरु असून चौथ्या टप्प्यातील प्रचाराची कामे सुरु आहेत. परंतु देशाचे पंतप्रधानांच्या दौऱ्यावेळी अनेक ठिकाणी या आचारसंहितेचा भंग करुन मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या डागडुजीची कामे करण्यात येत आहेत. ज्या ठिकाणी मोदींजी सभा होते, त्याठिकाणी रस्त्यांच्या डागडूजी केली जात असल्याचा आरोपही दानवे यांनी केला आहे.

### नकली कोण आणि असली कोण हे...

बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न देशात मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. २०१४ मध्ये मोदींनी सांगितलेली एकही गोष्ट त्यांनी दहा वर्षात पूर्ण केली नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर बोलण्यापेक्षा मोदींनी शेतकऱ्यांसाठी काय केलं हे बोलायला हवं होतं. नकली कोण आणि असली कोण हे चार तारखेनंतर आपल्याला कळेल. असली लोक हे मतदार आहेत आणि ते असली लोकांच्याच पाठीमागे आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीलाच यश मिळेल, असे त्यांनी म्हटले.

### करकरे, साळसकर, कामटेंचा जीव...

दबाव नसेल, त्यामुळे तुम्ही सांगाल. प्रामाणिकपणे त्यांनी सांगावं की, कुणी त्यांच्यावर दबाव आणला होता का? त्या वेळचं सरकार कॉंग्रेसचं होतं, एनसीपी पण सरकारमध्ये होतं. हेमंत करकरेंच्या सोबतची कॉन्स्पिरसी आणि साळसकरांच्या सोबतच्या कॉन्स्पिरसीसंदर्भात का नाही बोललात. केस निकमांनी चालवली, मात्र त्यात करकरे, साळसकर आणि कामटे यांच्या संदर्भातले पुरावे समोर येऊ दिले नाही. जयचंद कोण आहे? याचा उल्लेख निकम यांनी करावा. ते उमेदवार राष्ट्रभक्त संघटनेचे पक्षाचे आहेत, त्यांनी त्यांचा मान राखावा आणि त्यासंदर्भात खुलासा करावा. त्यावेळी हे मुद्दे चर्चेला आले, कांग्रेस, राष्ट्रवादी सत्तेत होते, विरोधी पक्ष भाजप होता, त्यांनी हा मुद्दा काढला नाही, असं प्रकाश आंबेडकरांनी यावेळी म्हटलं आहे.

### नक्षलवाद्यांकडून ३० मे रोजी ...

अनेक घातपाती कारवायांमध्ये या सर्वांचा प्रत्यक्ष सहभाग होता. जोगन्नावर गडचिरोलीत शंभरहून अधिक गुन्हे दाखल होते. मूळचा तेलंगणातील जयराम (जि. पेदापल्ली) येथे जोगन्नाचा जन्म झाला. बालवयात त्याचे वडील गेले, आईने दोन बहिणींची लग्ने केली. अस्पृश्यता, जातीवादाचे चटके सोसत जोगन्ना लहानाचा मोठा झाला. भर तारुण्यात शेतकऱ्यांच्या न्याय-हक्काची भाषा करू लागला, पण या आंदोलनात शेतकरी नेत्याची हत्या झाली आणि सुडाने पेटलेल्या जोगन्नाने अत्याचार करणाऱ्या जमीनदाराची हत्या केली. सहा महिन्यांनी जामिनावर सुटल्यावर तो नक्षलचळवळीत सामील झाला. सुरुवातीला नरसय्या नावाने तो परिचित होता, पण नक्षलचळवळीत त्याला जोगन्ना हे नाव देण्यात आले, असे पत्रकात नमूद आहे.

### मोदी जे बोलतात तेच करतात;...

अग्निपथ कवितेची आठवण येते असं एकनाथ शिंदे म्हणाले. ते म्हणाले की, मोदींच्या चेहऱ्यावर मी कधीही थकवा आणि उदासी पाहिली नाही. त्यांची राजकीय प्रवास हा अग्निपथ कवितेप्रमाणे आहे. २०१४ पूर्वी एकदाही कोणताही पंतप्रधान कल्याणमध्ये आला नव्हता. मोदी मात्र तीन वेळा कल्याणमध्ये आले. भिवंडी, ठाणे आणि कल्याण आपण जिंकलोय.